# प्रेस नोट

प्रति,

संपादक वृत्तपत्र

विषय :– आपले दैनिक वृत्तपत्रात बातमी प्रसिध्दी करण्याबाबत.

वर्धा शहरातील महादेवपुरा येथील मोटार सायकल चोरी काही तासातच उघड

हकीकत या प्रमाणे आहे की, दिनांक २१.१२.२०१८ रोजी फिर्यादी नामे श्रीमती संगीता जयंतराव बोडखे, वय ५५ वर्ष, रा. न्यु इंग्लीश हायस्कुल रोड हॅलो पॉईट झेरॉक्स समोर महादेवपुरा, वर्धा यांनी पोलीस स्टेशन येथे येवुन तक्रार दिली की, घटना ता.वेळी व स्थळी यातील फिर्यादी हिची होंडा कंपणीची मोपेड ग्रे रंगाची अॅक्टीव्हा ३ जी क्रमांक एम.एच.३२ ए.सी. ८८६५ जुनी वापरती कि. ३०,०००/– रु. ही घरा समोर आवारात हॅण्डल लॉक न करता ठेवली असता दिनांक २०.१२.२०१८ ते २१.१२.२०१८ चे रात्र दरम्यान कोणीतरी अज्ञान इसमाने चोरुन नेली फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व वाहनाचे कागदपत्रा वरुन पोलीस स्टेशन वर्धा शहर येथे अपराध क्रमांक २३३४/२०१८ कलम ३८९ भा.दं.वि. चा गुन्हा नोंद करुन तपासात घेतला.

सदर गुन्हयातील आरोपी हा बुनियादी शाळा परीसरात आपल्या ताब्यातील ग्रे. रंगाची अॅक्टीव्हा गाडी विकण्याकरीता किंवा गहाण ठेवण्याकरीता ग्राहक शोधत आहे. अशा माहिती वरुन आरोपी नामे विशाल अनिलराव काटवे, वय २७ वर्ष, रा. कारला चौक, सुदर्शननगर, वर्धा हा ग्रे. रंगाची अॅक्टीव्हा गाडीसह मिळुन आल्याने त्यास गाडीबाबत विचारपुस केली असता सदर गाडी महादेवपुरा, वर्धा येथुन चोरुन आणल्याची कबुली दिल्याने आरोपी याचे ताब्यातुन होंडा कंपणीची मोपेड ग्रे रंगाची अॅक्टीव्हा ३ जी क्रमांक एम.एच.३२ ए.सी. ८८६५ कि. ३०,०००/– रु. चा माल जप्त करण्यात आला.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक, श्री. डॉ. बसवराज तेली व मा. अपर पोलीस अधीक्षक, श्री. निखील पिंगळे सा. तसेच मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, वर्धा श्री. दिनेश कोल्हे सा. यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, चंद्रकांत मदने यांचे निर्देशाप्रमाणे पो.उप.नि नंदकीशोर खेकाडे यांचेसह पोलीस स्टेशन वर्धा शहर येथील ना.पो.शि./१३०९ जगदिश चव्हाण, ना.पो.शि./१४३५ महादेव सानप, ना.पो.शि./१२७ सचिन दवाळे, पो.शि./५२९ गंगाधर तांबारे यांनी केली.